ePaper
इराणवर अमेरिकेचे पुन्हा हल्ले; बंदर अब्बासचे ग्राउंड कंट्रोल स्टेशन उद्ध्वस्त

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज (TM)

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 30 मे 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

पुणे-पिंपरी हादरले! विषारी दारूमुळे १३ जणांचा मृत्यू...

## भारताचा फायदा; मात्र दीर्घकालीन करार होईपर्यंत तनाव कायम..!

# अमेरिकेची इराणशी ६० दिवसांची 'डील'

**महाईन्यूज । नवी दिल्ली**



**मध्य-पूर्वेतील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिका आणि इराण यांच्यात ६० दिवसांच्या तात्पुरत्या सामंजस्य करारावर (MOU) सहमती झाल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या संघर्षामुळे जगभरातील तेलपुरवठा आणि अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला होता. विशेषतः इराणने स्ट्रेट ऑफ होर्मुझ बंद करण्याच्या इशाऱ्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात मोठी अस्थिरता निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत झालेल्या या कराराला तज्ज्ञांनी "तात्पुरती जुगाड डील" असे संबोधले आहे.**

अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षात अलीकडेच मोठी वाढ झाली होती. इराणने होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा बंद करण्याची धमकी दिली होती, तर अमेरिकेने बंदर अब्बाससह काही संवेदनशील भागांवर कारवाई केली होती. त्याला इराणच्या IRGC दलाने प्रत्युत्तर दिल्यानंतर परिस्थिती अधिक चिघळली होती. या पार्श्वभूमीवर मध्यस्थीचे प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी थेट इराणशी चर्चा करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

### करारात नेमकं काय?

या ६० दिवसांच्या करारानुसार इराण स्ट्रेट ऑफ होर्मुझ खुला ठेवणार असून तेल आणि गॅस वाहतूक सुरळीत सुरू राहील. त्याबदल्यात अमेरिकेकडून इराणवरील काही आर्थिक निर्बंध शिथिल करण्याचे संकेत देण्यात आले आहेत.

तसेच दोन्ही देशांनी या कालावधीत एकमेकांवर ड्रोन किंवा मिसाईल हल्ले न करण्याचे मान्य केले आहे. अमेरिकन लष्कर आणि IRGC यांच्यात थेट संघर्ष टाळण्यावर भर देण्यात आला आहे.

इराणने आपल्या अणु कार्यक्रमाबाबत अधिक पारदर्शकता ठेवण्यास आणि IAEA निरीक्षकांना अधिक प्रवेश देण्यास तयारी दर्शवली आहे. त्याबदल्यात अमेरिका व्यापक अणुकराराच्या दिशेने चर्चा पुढे नेण्यास तयार असल्याचे समजते.

याशिवाय मध्य-पूर्वेतील तणाव कमी करण्यासाठी इराणसमर्थक हूती आणि हिज्बुल्ला गटांवर मोठ्या कारवाया टाळण्याचे संकेत अमेरिकेने दिल्याचे सांगितले जात आहे. इराणला मर्यादित तेल निर्यातीसाठीही काही प्रमाणात सूट मिळण्याची शक्यता आहे.


### भारतासाठी का महत्त्वाची?

भारतासाठी ही डील अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. कारण भारताच्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी मोठा हिस्सा आखाती देशांतून पूर्ण होतो. होर्मुझ सामुद्रधुनीतील तणावामुळे भारतात इंधन दर वाढण्यासोबत महागाईचाही दबाव वाढला होता. जर हा करार यशस्वी ठरला तर तेलपुरवठा स्थिर राहण्यास मदत होऊ शकते आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील अस्थिरता काही प्रमाणात कमी होऊ शकते. मात्र ६० दिवसांनंतर दीर्घकालीन करार झाला नाही, तर पुन्हा संघर्ष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.



### ट्रम्प यांना मोठा संघर्ष टाळायचा?

राजकीय विश्लेषकांच्या मते, डोनाल्ड ट्रम्प यांना सध्या मध्य-पूर्वेत मोठं युद्ध नको आहे. मात्र इराणवर दबाव कायम ठेवत अमेरिकेची भूमिका मजबूत दाखवण्याचाही त्यांचा प्रयत्न आहे. पुढील ६० दिवसांत दोन्ही देशांमध्ये व्यापक कराराबाबत चर्चा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जर ही चर्चा यशस्वी झाली, तर मध्य-पूर्वेतील परिस्थितीत मोठा बदल घडू शकतो; अन्यथा पुन्हा तणाव भडकण्याची शक्यता कायम राहणार आहे.



# समाविष्ट गावांमधून गॅसदाहिन्यांना विरोध!

## लाकडामुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी गेल्या काही वर्षांपासून महापालिका प्रशासन प्रयत्नशील

**महाईन्यूज । पुणे**

**लाकडामुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी गॅस आणि विद्युत दाहिनीच्या माध्यमातून अंत्यसंस्कार करण्यासाठी प्राधान्य द्यावे, यासाठी गेल्या काही वर्षांपासून महापालिका प्रशासन प्रयत्नशील आहे. मात्र, महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांसह इतर गावांमध्ये अंत्यविधी करण्यासाठी गॅसदाहिनी बसविण्यास विरोध होत आहे.**




समाविष्ट झालेल्या दोन गावांसाठी गॅसदाहिनी बसविण्यासाठी आवश्यक साहित्याची खरेदी महापालिकेने केली. मात्र, गावातील एका गटाचा त्याला विरोध होत असल्याने गॅसदाहिनी उभारणे अद्यापही महापालिकेला शक्य झालेले नाही. गॅसदाहिनी बसविण्याची मागणी काही नागरिकांनी केली. त्यामुळे महापालिका प्रशासनाने निविदा काढून आवश्यक साहित्याची खरेदी केली. महापालिकेत समाविष्ट झालेल्या गावांमध्ये अनेक इमारती झाल्या असून, मोठ्या सोसायट्यादेखील या परिसरात उभ्या राहिल्या आहेत. तेथील नागरिकांचा मृत्यू झाल्यास गॅसदाहिनी, विद्युतदाहिनीत अंत्यसंस्कार करण्याची व्यवस्था उपलब्ध नसल्याने येथील रहिवाश्यांना वैकुंठात यावे लागते. त्यामुळे वैकुंठ स्मशानभूमीवर ताण वाढत आहे.

महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत २९ स्मशानभूमी आहेत. यामध्ये एकूण २७ गॅसदाहिन्या आहेत. मात्र, असे असले तरी शहरातील ६० टक्के अंत्यसंस्कार हे शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या वैकुंठ स्मशानभूमीत होतात. नागरिकांना जवळच्या भागात अंत्यसंस्काराची सुविधा मिळावी आणि नागरिकांचा त्रास वाचावा, यासाठी महापालिकेने उपनगरांसह व समाविष्ट गावांमधील स्मशानभूमींमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच, तेथे विद्युतदाहिनी अथवा गॅसदाहिनी बसविण्याचेही नियोजन महापालिकेने केले आहे.

महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या आणि मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेल्या खडकवासला, येवलेवाडी, उत्तमनगर या गावांसह कर्वेनगर येथे गॅसदाहिनी बसविण्याचे नियोजन महापालिकेने केले होते. या ठिकाणी सध्या लाकडावर अंत्यसंस्कार केले जातात. या स्मशानभूमीमध्ये गॅस दाहिनीचा प्रकल्प उभारण्यासाठी पुरेशी जागा असल्याने पारंपरिक पद्धतीची व्यवस्था कायम ठेवून केंद्रीय अनुदानातून गॅसदाहिनी बसविण्याचे नियोजन करण्यात आले होते.

### गावांतील काही नागरिकांचा याला विरोध

या गावांतील काही नागरिकांनी याला विरोध केल्याने हे काम रखडले आहे. पारंपरिक पद्धतीने अंत्यविधी करण्याबरोबरच ज्यांना गॅस दाहिनीच्या माध्यमातून अंत्यसंस्कार करायचे आहेत, त्यांच्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रशासनाला प्रयत्न असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. मात्र, गॅसदाहिनी बसविल्यास पारंपारिक पद्धतीने अंत्यसंस्कार करू दिले जाणार नाहीत, अशी भीती ग्रामस्थांच्या मनात असल्याने याला विरोध होत असल्याची माहिती महापालिकेतील अधिकाऱ्यांनी दिली.

> “ महापालिकेत समाविष्ट झालेल्या काही गावांमध्ये अंत्यविधीसाठी गॅसदाहिनी बसविण्यासाठी विरोध होत आहे. गॅसदाहिनीबरोबरच पारंपरिक पद्धतीने दहन सुरूच राहणार आहे. अंत्यसंस्कार कसे करायचे हा निर्णय कुटुंबीयांचा असणार आहे. गॅस दाहिनीतील अंत्यसंस्कार मोफत केले जातात. पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी लाकडामुळे होणारे प्रदूषण टाळण्यासाठी गॅसदाहिनीचा पर्याय स्वीकारावा, यासाठी प्रबोधन केले जात आहे.
>
> **- मनिषा शेकटकर, विद्युत विभाग प्रमुख, पुणे महानगरपालिका.**

---

# पुण्यातील IT कंपनी एका रात्रीत अचानक गायब; पगार थकले, चेक बाऊन्स

**महाईन्यूज । पुणे**

**पुण्यातील हिंजवडी IT पार्कमधून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. हिंजवडी फेज-2 मधील एका IT कंपनीने अचानक कार्यालय बंद केल्याने 700 हून अधिक कर्मचारी, इंजिनिअर्स आणि इंटर्न्स अक्षरशः रस्त्यावर आल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेक महिन्यांपासून पगार रखडल्याचा, दिलेले धनादेश बाऊन्स झाल्याचा आणि आर्थिक फसवणुकीचा गंभीर आरोप कर्मचाऱ्यांनी कंपनीवर केला आहे.**



हिंजवडीतील Gera’s Imperium Rise इमारतीत कार्यरत असलेली Think Technology India ही कंपनी अचानक बंद झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे. प्रभावित कर्मचाऱ्यांच्या मते, कंपनीने 2025 मध्ये मोठ्या प्रमाणावर भरती केली होती. यात फ्रेशर्स, इंटर्न्स आणि IT व्यावसायिकांना मोठ्या संख्येने नोकरी देण्यात आली होती.

सुरुवातीच्या काळात इंटर्न्सना दरमहा 15 हजार रुपयांचे स्टायपेंड वेळेवर मिळत होते. त्यामुळे कंपनीबद्दल विश्वास निर्माण झाला होता. मात्र 2026 च्या सुरुवातीपासून परिस्थिती बदलू लागली, असा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.

या प्रकरणाची दखल Forum of IT Employees (FITE) या संघटनेने घेतली आहे. संघटनेचे अध्यक्ष पवनजीत माने यांनी सांगितले की, अनेक प्रभावित कर्मचाऱ्यांनी मदतीसाठी संघटनेकडे धाव घेतली असून पोलिसांकडे तक्रारही दाखल करण्यात आली आहे.

माने यांनी आणखी एक गंभीर आरोप केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, कंपनीने कर्मचाऱ्यांकडून लॅपटॉप देण्याच्या नावाखाली 15 हजार रुपयांचे सिक्युरिटी डिपॉझिट घेतले होते. हा प्रकार IT क्षेत्रातील गंभीर घोटाळा असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

### पगार थांबले आणि अचानक ऑफिसच बंद

कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, फेब्रुवारी 2026 पासून पगार नियमित मिळणे बंद झाले. दर महिन्याच्या 7 किंवा 8 तारखेला मिळणारा पगार वेळेवर जमा होत नव्हता. याबाबत विचारणा केल्यावर कंपनीचे CEO आणि संचालक हर्षल भानुदास ठाकरे यांनी कंपनीत अंतर्गत ऑडिट सुरू असल्याचे सांगत पगार 25 ते 28 फेब्रुवारीदरम्यान दिले जातील, असे आश्वासन दिले होते. मात्र, कर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ठरलेल्या मुदतीनंतरही पगार जमा झाला नाही. त्यानंतर अचानक कंपनीचे कार्यालय बंद असल्याचे समोर आले आणि कर्मचाऱ्यांमध्ये भीती पसरली.

### पगाराचे चेक बाऊन्स, कर्मचारी आर्थिक अडचणीत

काही कर्मचाऱ्यांनी असा आरोप केला आहे की, कंपनीकडून पगारासाठी देण्यात आलेले धनादेश बँकेत जमा केल्यानंतर बाऊन्स झाले. त्यामुळे अनेक कर्मचारी गंभीर आर्थिक अडचणीत सापडले आहेत. घरभाडे, EMI आणि दैनंदिन खर्च भागवणे कठीण झाल्याचे कर्मचारी सांगत आहेत.

# पिंपरी-चिंचवडच्या वीज व्यवस्थेला मेगा अपग्रेड

## २९१ कोटींच्या आराखड्यामुळे अखंडित, आधुनिक वीज वितरण व्यवस्थेचा मार्ग मोकळा

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**भोसरी विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाला मोठी गती देणारा ऐतिहासिक निर्णय घेत महावितरण प्रशासनाने 291.52 कोटींच्या शहर विकास आराखडा योजनेला मंजुरी दिली आहे. त्यासाठी पावर डिस्ट्रीब्यूशन इनहान्समेंट प्रोग्राम अंतर्गत निविदा प्रक्रिया राबवण्यात आली आहे.**

विशेषतः चिखली– मोशी– चऱ्होली या झपाट्याने विकसित होत असलेल्या 'रेसिडेन्सिअल कॉरिडोर' साठी पुढील 10 वर्षांच्या वीज पायाभूत सुविधांना हा प्रकल्प मोठा "बूस्टर डोस" ठरणार आहे.

पिंपरी- चिंचवडमध्ये वेगाने वाढणारे निवासी प्रकल्प, नवीन टाउनशिप, आयटी व औद्योगिक विस्तार आणि सातत्याने वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता भविष्यातील वीज गरजांचा सखोल अभ्यास करून हा विस्तृत DPR तयार करण्यात आला आहे. या योजनेमुळे भोसरी विधानसभा मतदारसंघातील वीज वितरण व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक, विश्वासार्ह आणि भविष्योन्मुख होणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फंडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार महेश लांडगे यांनी महावितरण सुविधा सक्षम करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. विधानसभा अधिवेशनात केलेला प्रभावी पाठपुरावा आणि नाशिक येथे होणारा कुंभमेळाव्याच्या निमित्ताने महावितरण इन्फ्रास्ट्रक्चर उभारणीला गती मिळालेली आहे.

सध्या भोसरी विभागात 4 लाख 58 हजारांहून अधिक ग्राहक असून, वाढत्या वीज मागणीमुळे विद्यमान यंत्रणेवर मोठा ताण निर्माण होत आहे. अनेक भागांमध्ये ओव्हरलोडिंग, व्होल्टेज फ्लक्चुएशन आणि तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने भविष्यातील गरज ओळखून ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात येत आहे.

> "भोसरी विधानसभा मतदारसंघातील वेगाने वाढणारी लोकसंख्या, नवीन टाउनशिप, उद्योग आणि निवासी प्रकल्प लक्षात घेता भविष्यासाठी सक्षम वीज पायाभूत सुविधा उभारणे ही काळाची गरज होती. महावितरण प्रशासनाने 291 कोटी रुपयांचा विकास आराखडा मंजूर केला आहे. त्यासाठी पावर डिस्ट्रीब्यूशन इनहान्समेंट प्रोग्राम अंतर्गत निविदा प्रक्रियासुद्धा राबविलेली आहे. यामुळे चिखली–मोशी–चऱ्होलीसह संपूर्ण परिसराला मोठा दिलासा मिळणार आहे. या योजनेमुळे नागरिकांना अधिक दर्जेदार, अखंडित आणि विश्वासार्ह वीजपुरवठा मिळेल, तसेच भविष्यातील औद्योगिक व निवासी विकासालाही मोठी चालना मिळणार आहे.
> मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली भोसरी मतदारसंघाला 'FUTURE READY ELECTRICITY INFRASTRUCTURE' बळकट करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी- चिंचवड, पुणे.**



### जीवनमान उंचावण्यासाठी निर्णायक पाऊल..

मोशी–चिखली–चऱ्होली हा परिसर पुणे शहराच्या भविष्यातील सर्वात मोठ्या RESIDENTIAL GROWTH CORRIDOR म्हणून वेगाने विकसित होत आहे. हजारो नवीन घरे, टाउनशिप, शैक्षणिक संस्था, हॉस्पिटल्स, व्यावसायिक संकुले आणि उद्योग येथे उभे राहत आहेत. अशा परिस्थितीत पुढील दशकाचा विचार करून उभारण्यात येणारी ही वीज पायाभूत सुविधा भविष्यातील विकासाचा मजबूत पाया ठरणार आहे. भोसरी विधानसभा मतदारसंघाला "FUTURE READY ELECTRICITY INFRASTRUCTURE" देणारा हा प्रकल्प केवळ वीज योजनेपुरता मर्यादित नसून, पुढील अनेक वर्षांसाठी नियोजित शहरी विकास, गुंतवणूक, उद्योगवाढ आणि नागरिकांच्या जीवनमान उंचावण्यासाठी निर्णायक पाऊल मानला जात आहे.

### 10 नवीन उपकेंद्र!

या प्रकल्पांतर्गत 10 नवीन उपकेंद्रे, 220 किलोमीटर उच्चदाब वीजवाहिन्या, 150 किलोमीटर लघुदाब वीजवाहिन्या, 100 नवीन रोहित्रे, 128 रोहित्र क्षमता वाढ, 105 RMU, 160 फीडर पिलर तसेच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित वीज वितरण सुविधा उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे चिखली, मोशी, चऱ्होली, दिघी आणि MIDC परिसरातील भविष्यातील वाढती निवासी व औद्योगिक वीज मागणी सक्षमपणे पूर्ण करता येणार आहे.

विशेष म्हणजे, या योजनेमुळे नागरिकांना अधिक दर्जेदार, अखंडित आणि विश्वासार्ह वीजपुरवठा उपलब्ध होणार असून वीज खंडित होण्याचे प्रमाण कमी होईल. तांत्रिक बिघाड झाल्यास प्रभावित भाग त्वरित वेगळा करून कमी वेळेत वीजपुरवठा पूर्ववत करता येणार आहे. तसेच TECHNICAL LOSS आणि AT & C LOSS कमी होऊन संपूर्ण वीज वितरण व्यवस्था अधिक कार्यक्षम होणार आहे.

# पुणे–पिंपरी हादरले! विषारी दारूमुळे १३ जणांचा मृत्यू...

**महाईन्यूज** | पिंपरी-चिंचवड

**पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली असून विषारी स्पिरिटयुक्त हातभट्टीची दारू प्यायल्याने गेल्या ४८ तासांत तब्बल १३ जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक जण विविध रुग्णालयांत उपचार घेत असून काहींची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपी आणि सराईत दारू विक्रेता योगेश वानखेडे याला अटक केली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवडमधील दापोडी आणि फुगेवाडी परिसरात गुरुवारी विषारी दारू प्रकरण उघडकीस आले. सुरुवातीला आठ जणांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर उपचार सुरू असलेल्या आणखी काही जणांचा मृत्यू झाल्याने मृतांचा आकडा १३ वर पोहोचला आहे. दुसरीकडे पुण्यातील काळे पडळ आणि हडपसर परिसरातही या विषारी दारूने थैमान घातले असून तेथेही



पाच जणांचा मृत्यू झाला आहे.

दारू सेवन केल्यानंतर संबंधितांच्या तोंडाला फेस येणे, श्वास घेण्यास त्रास होणे, अचानक बेशुद्ध पडणे अशी लक्षणे दिसून आली. काहींचा जागीच मृत्यू झाला, तर काहींनी उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला. सध्या काही नागरिकांवर शहरातील विविध रुग्णालयांत उपचार सुरू असून डॉक्टरांनी दोघांची प्रकृती अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले आहे.

पोलीस तपासात समोर आले आहे की, ही विषारी स्पिरिटयुक्त दारू सराईत गुन्हेगार योगेश वानखेडे याने तयार केली होती. त्याच्यावर यापूर्वीही अवैध दारू विक्रीचे अनेक गुन्हे दाखल आहेत. त्याने तयार केलेली ही जीवघेणी दारू पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील विविध भागांत विकली गेली होती. पोलिसांनी तातडीने कारवाई करत योगेश वानखेडेला अटक केली असून त्याच्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे. या दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांमध्ये पांडुरंग फुगे, विजय राठोड, राजेंद्र राठोड, राजू राजपूत, अकबर पठाण, बाबा शेख, आनंद देसाई, आनंद निकाळजे, अक्षय अवसरमल, सौरभप्पा भंगारी आणि भीमाप्पा पुजारी यांचा समावेश आहे. पुण्यातील उर्वरित दोन मृतांची ओळख अद्याप समजू शकलेली नाही.

दरम्यान, शहरात बंदी असतानाही हातभट्टीची विषारी दारू खुलेआम विकली जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. या घटनेनंतर पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असून नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. अवैध दारू विक्रीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

### योगेश वानखेडेने बनवली होती दारू

पोलीस तपासात समोर आले आहे की, ही विषारी स्पिरिटयुक्त दारू योगेश वानखेडे याने तयार केली होती. योगेश हा सराईत दारू विक्रेता असून त्याच्यावर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल आहेत. त्याने बनवलेली ही जीवघेणी दारू पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या वेगवेगळ्या भागांत मोठ्या प्रमाणावर विकली गेली होती. पोलिसांनी तातडीने कारवाई करत मुख्य सूत्रधार योगेश वानखेडे याला बेड्या ठोकल्या आहेत.



## भूमिका

# संतांच्या शिकवणीवर प्रतिगामी विचारांचे सावट

**वारकरी संप्रदायातील समतेचा, विवेकाचा आणि सामाजिक सलोख्याचा वारसा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा महत्त्वाचा भाग मानला जातो. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, चोखामेळा, गाडगेबाबा यांसारख्या संतांनी भक्तीच्या माध्यमातून जातिभेद, अंधश्रद्धा आणि कर्मकांडाविरोधात आवाज उठवला.**




त्यामुळे वारकरी परंपरा ही केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची चळवळ ठरली. मात्र, अलीकडच्या काळात या परंपरेत विसंगत विचारांची घुसखोरी होत असल्याचा आरोप पुढे येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केलेल्या मतांमुळे हा विषय पुन्हा चर्चेत आला. त्यांनी वारकरी संप्रदायातील काही प्रवचनांमध्ये धार्मिक ध्रुवीकरण, असंबद्ध इतिहास आणि बहुसंख्याकवादी राष्ट्रवादाचा प्रभाव वाढत असल्याची चिंता व्यक्त केली. त्यांच्या मते, संतांचा विवेकवादी आणि समतावादी संदेश बाजूला सारून कर्मकांड व अंधश्रद्धेला प्रोत्साहन दिले जात आहे. या विधानानंतर निर्माण झालेला वाद आणि विकास लवांडे यांच्या अटकेमुळे प्रश्न अधिकच गडद झाला.

इतिहास पाहिला तर समतावादी परंपरांमध्ये वैदिक ब्राह्मणवादी विचारांचा हस्तक्षेप नवीन नाही. बौद्ध आणि जैन परंपरांतील अनेक संकल्पना पुढे मुख्य प्रवाहातील धर्मव्यवस्थेत सामावून घेतल्या गेल्या.

बुद्धांना विष्णूचा अवतार मानणे किंवा संतांच्या शिकवणुकीला केवळ मूर्तीपूजेत मर्यादित करणे, ही त्याची उदाहरणे आहेत. वारकरी संतांनी माणुसकी, श्रमप्रतिष्ठा आणि नैतिक आचरण यांना महत्त्व दिले; परंतु कालांतराने त्यांच्या विचारांपेक्षा त्यांच्या प्रतिमा आणि कर्मकांड यांनाच अधिक महत्त्व दिले गेले. आजही अनेक ठिकाणी संतांच्या नावाने मंदिर, पूजा आणि धार्मिक विधी वाढताना दिसतात. गाडगेबाबांसारख्या संतांनी अंधश्रद्धा व कर्मकांडाला विरोध केला होता; मात्र त्यांच्या नावानेही कर्मकांड चालवले जात असल्याची विसंगती दिसून येते. यामुळे संतांचा मूळ सामाजिक संदेश दुय्यम ठरत असल्याची टीका केली जाते.

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या सामाजिक ऐक्याचा आधार राहिला आहे. त्यामुळे त्यात कोणत्याही प्रकारचे राजकीय, जातीय किंवा धार्मिक ध्रुवीकरण शिरकाव करू नये, ही काळाची गरज आहे.

संतांच्या विचारांचा गौरव फक्त पालखी, मंदिर किंवा घोषणांपुरता मर्यादित न राहता तो प्रत्यक्ष समाजजीवनात उतरवणे अधिक महत्त्वाचे आहे. समता, बंधुता आणि विवेक हीच वारकरी परंपरेची खरी ताकद असून ती जपणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

## प्रासंगिक »

### निर्मळता

**गुरु आणि शिष्य जंगलातून प्रवास करत होते. वाटेत एका झऱ्याजवळ ते थांबले. गुरुजींना तहान लागल्याने त्यांनी शिष्याला पाणी आणण्यास सांगितले.**

शिष्य झऱ्याकडे गेला, पण तेथील पाणी बैलगाड्या गेल्यामुळे गढूळ झाले होते. त्याने विचार केला की असे घाण पाणी गुरुजींना देणे योग्य नाही. तो रिकाम्या हाताने परत आला.

गुरुजींनी त्याला पुन्हा पाणी आणायला सांगितले. असे चार-पाच वेळा झाले. प्रत्येक वेळी पाणी गढूळच दिसत होते. शेवटी शिष्य पुन्हा झऱ्याकडे गेला तेव्हा त्याला पाणी अगदी स्वच्छ आणि निर्मळ दिसले. त्याने आनंदाने पाणी भरून गुरुजींकडे आणले.

गुरुजी म्हणाले, “वत्सा, आपल्या मनाचेही असेच असते. राग, द्वेष, चिंता आणि कुविचार मनाला गढूळ करतात. पण थोडा संयम ठेवला, मन शांत होऊ दिले तर विचारही निर्मळ होतात. भावनेच्या भरात घेतलेले निर्णय चुकीचे ठरू शकतात.”

- तात्पर्य : **मन शांत आणि स्वच्छ ठेवले तर योग्य विचार आणि योग्य निर्णय घेता येतात.**

भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हानांचे वर्णन करताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी इंधन, खते आणि परकीय चलन या तीन ‘फ’कारांचा उल्लेख केला.

# अर्थव्यवस्थेतील चौथा ‘फ’कार : फसव्या स्वप्नांचा फेरा

त्यांच्या विधानात तथ्य असले तरी या संकटांचे मूळ केवळ बाह्य परिस्थितीत नसून धोरणात्मक विसंगतीतही आहे. त्यामुळे या तीन ‘फ’कारांइतकाच महत्त्वाचा चौथा ‘फ’ म्हणजे ‘फसवणूक’ किंवा स्वतःच्या दाव्यांमध्ये अडकून पडणे, हाही चर्चेचा विषय ठरतो.

इंधनाच्या बाबतीत भारताचे परावलंबित्व जुनेच आहे. देशाला लागणाऱ्या बहुतांश पेट्रोलियम पदार्थांची आयात करावी लागते. इथेनॉल मिश्रणाचा कार्यक्रम राबवून आयात कमी करण्याचे उद्दिष्ट जाहीर झाले, मात्र त्याची अपेक्षित अंमलबजावणी दिसली नाही. दुसरीकडे, आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर कमी असतानाही केंद्र सरकारने अबकारी कर वाढवून मोठा महसूल गोळा केला. पण त्याचा फायदा सामान्य ग्राहकांना मिळाला नाही. आता दरवाढीचे कारण देत सरकार अडचणी मांडत असले तरी पूर्वीच्या निर्णयांची जबाबदारीही स्वीकारावी लागेल. खतांच्या



अनुदानाबाबतही अशीच स्थिती आहे. शेतकऱ्यांना मदत करण्याच्या नावाखाली सरकार मोठ्या प्रमाणावर अनुदान देते. परंतु शेतकऱ्यांची खरी मागणी स्वस्त खतांपेक्षा उत्पादनाला हमीभाव आणि योग्य बाजारपेठ ही आहे.

सरकार एका बाजूला ‘रेवडी संस्कृती’वर टीका करते, तर दुसऱ्या बाजूला प्रचंड अनुदानाची व्यवस्था कायम ठेवते. जर देशात गरिबी कमी होत असल्याचा दावा केला जात असेल, तर अनुदानाचे ओझे कमी का होत नाही, हा प्रश्न निर्माण होतो. परकीय चलनाच्या बाबतीतही चित्र उत्साहवर्धक नाही. ‘मेक इन इंडिया’ आणि उत्पादन आधारित प्रोत्साहन योजनांचा मोठा गाजावाजा झाला. मात्र, प्रत्यक्षात निर्यातीत अपेक्षित वाढ झाली नाही. अनेक परदेशी उद्योग भारतात येण्याऐवजी व्हिएतनाम आणि मलेशियासारख्या देशांकडे वळले. याशिवाय गुंतवणुकीवरील कर आणि कठोर नियमांमुळे परदेशी गुंतवणूकदारांनी भारतातून पैसा काढून घेतला. त्यामुळे रुपयावर दबाव वाढला आणि रिझर्व्ह बँकेला हस्तक्षेप करावा लागला.

या सर्व परिस्थितीत सरकारने दाखवलेली ‘भारत चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था’, ‘जगातील सर्वात वेगाने वाढणारा देश’ अशी रंगीत स्वप्ने वास्तवापेक्षा अधिक ठळक ठरली. आशावाद आवश्यक असतो; पण तो वास्तवाच्या भानावर आधारित असणे अधिक महत्त्वाचे असते. अन्यथा अपेक्षा आणि वास्तव यातील दरी वाढते. त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या संकटांचा विचार करताना केवळ बाह्य कारणांवर दोष न देता धोरणातील त्रुटी आणि अतिरेकी दाव्यांचाही प्रामाणिकपणे विचार होणे आवश्यक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



न देखें न बोलें नाइकें आणीक ।
बैसला हा एक हरि चित्तीं ॥१॥

सासुरें माहेर मज नाहीं कोणी ।
एक केलें दोन्ही मिळोनियां॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मनोज जरांगेंचा पुन्हा उपोषणाचा इशारा

## भर उन्हात उपोषण सुरू करण्याचा इशारा; राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने जरांगेंची भेट घेतली

महाईन्यूज । मुंबई

**मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा राज्यातील राजकीय वातावरण तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. मराठा आंदोलनाचे प्रमुख नेते मनोज जरांगे पाटील यांनी ३० मेपासून बेमुदत उपोषण सुरू करण्याचा इशारा दिल्याने राज्य सरकारची चिंता वाढली आहे. विशेष म्हणजे, यावेळी त्यांनी "भर उन्हात" उपोषण करण्याचा निर्धार व्यक्त केल्यामुळे प्रशासन अधिक सतर्क झाले आहे. सध्या राज्यात उष्णतेची तीव्र लाट असून तापमानात मोठी वाढ झाली आहे.**



अशा परिस्थितीत जरांगे पाटील यांच्या प्रकृतीवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे आणि सगेसोयऱ्यांच्या अध्यादेशाची तातडीने अंमलबजावणी व्हावी, ही जरांगे पाटील यांची प्रमुख मागणी आहे. यापूर्वी त्यांनी सरकारला अनेक वेळा मुदत देत आंदोलन स्थगित केले होते. मात्र, सरकारकडून अपेक्षित निर्णय न झाल्याने त्यांनी पुन्हा आक्रमक भूमिका घेतली आहे. "सरकारने आश्वासने न देता प्रत्यक्ष निर्णय घ्यावा, अन्यथा आता माघार नाही," असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला आहे.

या पार्श्वभूमीवर आज राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे जाऊन जरांगे पाटील यांची भेट घेतली. या भेटीत आंदोलन मागे घेण्याबाबत चर्चा झाल्याची माहिती समोर येत आहे. सरकारकडून आंदोलन टाळण्यासाठी प्रयत्न सुरू असले तरी, जरांगे पाटील आपल्या भूमिकेवर ठाम असल्याचे दिसून आले. त्यामुळे पुढील काही दिवस राज्यातील राजकीय आणि सामाजिक घडामोडींसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

मराठा आरक्षणाचा प्रश्न गेल्या काही वर्षांपासून राज्यातील सर्वात संवेदनशील मुद्दा बनला आहे. लाखो मराठा तरुणांचे शिक्षण, नोकऱ्या आणि भविष्य या प्रश्नाशी जोडले गेले आहे. त्यामुळे या आंदोलनाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. जरांगे पाटील यांच्या आंदोलनामुळे सरकारवर सातत्याने दबाव निर्माण होत असून, विरोधकही या मुद्द्यावरून सरकारला घेरण्याचा प्रयत्न करत आहेत.

दरम्यान, जरांगे पाटील यांच्या प्रकृतीची चिंता त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त केली जात आहे. यापूर्वीच्या उपोषणांमध्ये त्यांची तब्येत बिघडल्याचे चित्र राज्याने पाहिले आहे. त्यामुळे यावेळी भर उन्हात सुरू होणारे उपोषण किती काळ चालणार आणि सरकार त्यावर काय भूमिका घेणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर आता सरकार कोणता निर्णायक निर्णय घेते, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे. मराठा समाजातील तरुणांमध्ये सध्या मोठी अस्वस्थता निर्माण झाली असून, सरकारकडून ठोस निर्णयाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अनेक सामाजिक संघटना आणि मराठा बांधवांनी जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा जाहीर केला आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर बैठका आणि मोर्चांचे नियोजन सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. उपोषणाच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्याची तयारी प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे.

### मनोज जरांगे पाटील यांच्या मुख्य मागण्या काय आहेत?

- मंत्रीमंडळ उपसमिती बरखास्त करा.
- सातारा संस्थान गॅजेट आरक्षणाचा जीआर काढा
- मराठवाड्यातील सगळ्या मराठ्यांना ३० मे च्या आत कुणबी प्रमाणपत्र द्यावे.
- महाराष्ट्रातील मराठा आंदोलकांवरील सर्व गुन्हे सरसकट मागे घेण्यात यावेत.
- वाटलेल्या कुणबी प्रमाणपत्रांच्या नोंदी ग्रामपंचायतीवर लावाव्यात.
- आठ महिने झाले तरीही सातारा संस्थांनाचा जीआर काढला नाही तो लवकरात लवकर काढावा.

# विधानपरिषद निवडणुकीच्या जागावाटपाची मविआची घोषणा; १५ जागांवर एकमत

महाईन्यूज । मुंबई

**राज्यात विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आल्याचं पाहायला मिळत आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने एकीकडे महायुतीच्या नेत्यांमध्ये बैठका सुरू आहेत, तर दुसरीकडे महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्येही बैठकांचा धडाका सुरू आहे. या पार्श्वभूमीवरच महाविकास आघाडीची महत्वाची बैठक पार पडली आहे.**







या बैठकीत महाविकास आघाडीचा विधानपरिषदेच्या निवडणुकीच्या जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे.

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज संयुक्त पत्रकार परिषद घेत महाविकास आघाडीतील कोणता पक्ष किती जागा लढवणार? याची घोषणा करण्यात आली आहे. महाविकास आघाडी संपूर्ण १७ जागा लढवणार असून यापैकी १५ जागांवर महाविकास आघाडीच्या नेत्यांचं एकमत झालं आहे. तसेच राहिलेल्या दोन जागांबाबतचा निर्णय दोन दिवसांत घेतला जाणार असल्याची माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.

"विधानपरिषदेच्या या निवडणुकीला आम्ही महाविकास आघाडी म्हणून सामोरं जात आहोत. या निवडणुकीचा जो मुद्दा आहे, तो म्हणजे भारतीय जनता पक्षाच्या घोडेबाजाराला न जुमानता आम्ही लोकशाही वाचवण्यासाठी या निवडणुकीत पुढे जात आहोत. या निवडणुकीत मोठ्या प्रमाणात पैसे खर्च केले जात असल्याचं दिसत आहे. पैसा फेक तमाशा देख अशी सर्व परिस्थिती आहे. अनेक ठिकाणी ५ लाख रुपये देऊन नगरसेवकांना उचलण्यात येत आहे, या निवडणुकीत फक्त विरोधी पक्षच नाही तर सत्ताधारी पक्ष देखील आपआपल्या मित्र पक्षांचे मतदार पळवत असून असा अशा प्रकारे हा घोडेबाजार सुरू आहे", असा गंभीर आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. येणाऱ्या दोन दिवसांत या राहिलेल्या दोन जागांबाबत देखील आमचा अंतिम निर्णय होईल. नांदेड आणि नाशिकच्या जागेबाबत आमच्या तिन्ही पक्षांनी दावा केला आहे. त्यामुळे या दोन्ही जागा वगळता इतर १५ जागांबाबत आम्ही आज निर्णय जाहीर केला आहे", असं सपकाळ यांनी सांगितलं आहे.

### महाविकास आघाडीत कोणत्या दोन जागांवरून तिढा?

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज संयुक्त पत्रकार परिषद घेत विधानपरिषदेच्या कोणत्या जागा लढवणार? याची घोषणा केली आहे. मात्र, १७ पैकी १५ जागांवर महाविकास आघाडीच्या नेत्यांचं एकमत झालं असून राहिलेल्या दोन जागांबाबत महाविकास आघाडीतील नेत्यांमध्ये एकमत होऊ शकलं नाही. नांदेड आणि नाशिकच्या जागेबाबत महाविकास आघाडीतील तिनही पक्षांनी दावा केला आहे. त्यामुळे नांदेड आणि नाशिकच्या जागेवरून महाविकास आघाडीत तिढा निर्माण झाला आहे. मात्र, याबाबतही दोन दिवसांत अंतिम निर्णय घेतला जाईल, अशी माहिती हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.

# होर्मुझ सामुद्रधुनी रणनीतित ओमानही?

## खासदार काकोली घोष यांचा TMC च्या सर्व संघटनात्मक पदांचा तडकाफडकी राजीनामा

**महाईन्यूज । इराण**

**जगाला होणाऱ्या एकूण पुरवठ्यापैकी २० ते २५ टक्के इंधन व नैसर्गिक वायू होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे पोहोचवला जातो. इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतून इंधन व एलएनजी वाहतूक करणाऱ्या तेलवाहू जहाजांना रोखून धरले आहे. त्यामुळे आशियातील देशांमध्ये इंधनाचा तुटवडा व किंमती वाढल्या आहेत. होर्मुझ सामुद्रधुनीबाबत घेतल्या जाणाऱ्या निर्णयांमध्ये ओमानही सहभागी आहे, असे इराणकडून सांगण्यात आले. त्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ओमानला हल्ल्याच्या धमक्या दिल्या.**



तेलवाहू जहाजांना किती टोल आकारायचा हे ठरवण्यात ओमानही सहभागी होता, असे इराणने सांगितले. दरम्यान ओमान हा देश पाकिस्तानप्रमाणेच इराण व अमेरिका या दोघांचाही विश्वासू देश आहे. जगात कच्च्या तेलाच्या किंमती वाढण्यात व टंचाई निर्माण होण्यात ओमानचा हात आहे का?

आखाती देशांत उत्पादन केले जाणारे कच्चे तेल हे पर्शियन गल्फमधून पुढे होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे जगभरातील देशांमध्ये पोहोचवले जाते. होर्मुझ सामुद्रधुनी ही ओमान व इराण या दोन देशांमध्ये आहे. हा अत्यंत निमुळता आणि कमी रूंदी असलेला सागरी मार्ग आहे. याच मार्गाद्वारे जगातील २० ते २५ टक्के कच्चे तेल व इंधनाची वाहतूक जहाजांमार्फत केली जाते. त्यामुळे जगासाठी होर्मुझ सामुद्रधुनी अत्यंत संवेदनशील आहे. होर्मुझ सामुद्रधुनीत होणाऱ्या घटनांचे पडसाद थेट आंतरराष्ट्रीय बाजारात उमटतात.

ऊर्जा निर्यात करणारे देश, इन्शुरन्स कंपन्या, जहाज वाहतूक करणाऱ्या कंपन्या यांचे होर्मुझ सामुद्रधुनीवर बारीक लक्ष असते. त्याचे कारण म्हणजे होर्मुझ सामुद्रधुनीत घडणाऱ्या घटनांचे आर्थिक परिणाम तात्काळ समोर येतात. २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका व इस्रायलने इराणवर हवाई हल्ला करत इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांना ठार केले. त्यानंतर इराणच्या सशस्त्र दलाने (IRGC) होर्मुझ सामुद्रधुनीतील जहाजांची वाहतूक रोखली. एकवेळ होर्मुझ सामुद्रधुनीत तब्बल १५५० हून अधिक तेलवाहू जहाज अडकून पडल्या होत्या. जहाजांना धोका वाढल्याने जहाजांच्या इन्शुरन्सची रक्कम तब्बल सहापट वाढली होती.

### ओमानची भौगोलिक परिस्थिती आणि होर्मुझ सामुद्रधुनी

होर्मुझ सामुद्रधुनीची रूंदी सर्वात निमुळत्या ठिकाणी ३९ किमी आहे. प्रत्यक्षात मोठ्या तेलवाहू जहाजांना ये-जा करण्यासाठी होर्मुझ सामुद्रधुनीच्या या भागात फारच कमी जागा मिळते. जहाजांची धडक होऊ नये म्हणून साधारण तीन किमीच्या दोन लेन पाडण्यात आल्या आहेत. त्या लेनमधून जहाज ये-जा करतात. होर्मुझ सामुद्रधुनीच्या उत्तरेकडील भागात इराणची किनारपट्टी आहे. या किनारपट्टीलगत पाण्याची खोली खूपच कमी आहे. तसेच हा भाग खडकाळ आहे.

### होर्मुझ सामुद्रधुनीत टोल आकारण्याने कोणता वाद?

इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तेलवाहू जहाजांना टोल आकारण्यास सुरूवात केली आहे. टोल किती आकारायचा याबाबत झालेल्या चर्चेत ओमान सहभागी होता, असे इराणने म्हटले आहे. इराणने ५ मे रोजी पर्शियन गल्फ स्ट्रेट ऑथोरिटीची स्थापना केली. या ऑथोरिटीमार्फत इराण जहाजांवर नियंत्रण व देखरेख ठेवणार आहे. जहाजांना टोलही आकारणार आहे. कच्च्या तेलाच्या प्रति बॅरलसाठी इराण प्रत्येकी एक डॉलर टोल आकारत आहे. जहाजांनी ईमेलद्वारे जहाजाची संपूर्ण माहिती इराणच्या सशस्त्र दलाला (IRGC) द्यावी लागते.

# यूपीएससीमध्ये कधी पेपरफुटी झाली नाही, त्यांच्याकडून धडा घ्या’

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**नीट (NEET) परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणात सीबीआयने आतापर्यंत अटक केलेल्यांची संख्या ११ च्याही पुढे गेली आहे. सीबीआयकडून नीट पेपरफुटी प्रकरणात सखोल चौकशी केली जात आहे. यंदा जवळपास २२.७ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ही नीटची परीक्षा दिली होती. पण पेपरफुटीच्या घटनेमुळे केंद्र सरकारने ही परीक्षा रद्द केली.**



आता २१ जून रोजी ही नीटची पुनर्परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यामुळे या २२ लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना पुन्हा नीट (NEET) परीक्षा द्यावी लागणार आहे.

दरम्यान, या नीट (NEET) परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज (२९ मे) सुनावणी पार पडली आहे. या सुनावणी दरम्यान सर्वोच्च न्यायालयाने नीट (NEET) परीक्षा पेपरफुटीवरून एनटीएला फटकारलं आहे. ‘यूपीएससीमध्ये कधी पेपरफुटी झाली नाही, त्यांच्याकडून धडा घ्या’, असं सांगत सर्वोच्च न्यायालयाने एनटीएला फटकारलं आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

नीट (NEET) परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणावरून सर्वोच्च न्यायालयाने नॅशनल टेस्टिंग एजन्सी (NTA) ला विचारलं की, देखरेख यंत्रणा आणि पर्यवेक्षण समित्या अस्तित्वात असूनही एवढी मोठी पेपर फुटीची घटना कशी घडू शकते? असा सवाल न्यायालयाने विचारला. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने यूपीएससीशी तुलना करत न्यायालयाने म्हटलं की, “देशाच्या या प्रमुख नागरी सेवा परीक्षेत अशा पेपर फुटीच्या घटना कधीही घडल्या नाहीत, त्यामुळे त्यांच्याकडून नॅशनल टेस्टिंग एजन्सीला धडा घेण्याची गरज आहे.”

केंद्र सरकारच्यावतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सर्वोच्च न्यायालयाला सांगितलं की, ‘पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतः या प्रकरणावर लक्ष ठेवून आहेत.’ सर्वोच्च न्यायालयाने नीट परीक्षेचा पेपर रद्द झाल्याबद्दल चिंता व्यक्त केली. तसेच आता ही परीक्षा योग्यरित्या पार पाडली जाईल याची खात्री करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी फेरपरीक्षेपूर्वी अनेक सुरक्षा उपाययोजना लागू केल्या जातील.

### नीटच्या पुनर्परीक्षेची तारीख काय?

एनटीएनं नीट पुनर्परीक्षेची तारीख जाहीर केलेली आहे. त्यानुसार येत्या २१ जून रोजी रविवारी नीटची पुनर्परीक्षा पार पडणार आहे. परीक्षेची तारीख जाहीर झाल्यामुळे आता विद्यार्थ्यांना त्यादृष्टीने अभ्यासाचं नियोजन करावं लागणार आहे. तसेच एनटीएने विद्यार्थी आणि पालकांना एक महत्त्वाचं आवाहनही केलेलं आहे. परीक्षेबाबतच्या कोणत्याही माहितीसाठी केवळ नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या अधिकृत माध्यमांवरच विश्वास ठेवावा असं स्पष्ट करण्यात आलं आहे.

# अपघाताने हिरावली ओळख



९० च्या दशकात आपल्या निरागस सौंदर्याने आणि अभिनयाने लाखो चाहत्यांच्या मनावर राज्य करणारी अभिनेत्री अनु अग्रवाल पुन्हा चर्चेत आली आहे. 'आशिकी' या सुपरहिट चित्रपटातून रातोरात स्टार बनलेल्या अनुच्या आयुष्यात एका भीषण अपघाताने अशी कलाटणी दिली की तिचं संपूर्ण आयुष्यच बदलून गेलं. १९९० साली प्रदर्शित झालेल्या महेश भट्ट दिग्दर्शित 'आशिकी' या चित्रपटातून अनु अग्रवाल आणि राहुल रॉय यांनी बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला, तर नदीम-श्रवण यांच्या संगीताने इतिहास रचला. 'नजर के सामने', 'धीरे धीरे से' आणि 'मैं दुनिया भुला दूंगा' यांसारखी गाणी आजही चाहत्यांच्या ओठांवर आहेत. 'आशिकी'च्या प्रचंड यशानंतर अनु अग्रवालने 'किंग अंकल', 'खलनायिका', 'जनम कुंडली' आणि 'रिटर्न ऑफ द ज्वेल थीफ' यांसारख्या चित्रपटांमध्ये काम केले. मात्र, तिच्या पुढील चित्रपटांना 'आशिकी'सारखे यश मिळाले नाही. हळूहळू ती चित्रपटसृष्टीपासून दूर गेली आणि १९९६ नंतर तिने अभिनयालाच रामराम केला. अनुने नंतर एका मुलाखतीत सांगितले की, तिच्या सावळ्या रंगामुळे तिला इंडस्ट्रीमध्ये अनेकदा ट्रोलिंगचा सामना करावा लागला. गोरा मेकअप करण्यास भाग पाडले जात असल्याने तिने एक मोठी मॉडेलिंग असाइनमेंटही नाकारली होती. "मी जशी आहे तशीच स्वीकारा," अशी ठाम भूमिका तिने घेतली होती.



# 'भारत भाग्य विधाता'चा मोशन पोस्टर रिलीज

अभिनेत्री कंगना रनौतच्या आगामी 'भारत भाग्य विधाता' या चित्रपटाचा नवा मोशन पोस्टर नुकताच प्रदर्शित झाला आहे. हा पोस्टर २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्याच्या वेळी रुग्णालयात काम करणाऱ्या सामान्य कर्मचाऱ्यांच्या धैर्याला सलाम करणारा आहे. पोस्टर रिलीज होताच सोशल मीडियावर त्याची चर्चा सुरू झाली आहे. 'द अनसीन हिरोज' या संकल्पनेवर आधारित या पोस्टरमध्ये नर्स, वॉर्ड बॉय, सुरक्षा रक्षक, स्वच्छता कर्मचारी, लिफ्ट ऑपरेटर आणि रुग्णालयातील इतर कर्मचाऱ्यांची झलक दाखवण्यात आली आहे. संकटाच्या वेळी या लोकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून अनेकांचे प्राण वाचवले होते. या सामान्य पण धाडसी लोकांची कहाणी या चित्रपटातून मांडण्यात येणार आहे. कंगना रनौतने सांगितले की, हा चित्रपट कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता इतरांसाठी पुढे येणाऱ्या लोकांना समर्पित आहे. "संकटाच्या वेळी माणुसकीच सर्वात मोठी ताकद ठरते," असे ती म्हणाली. रुग्णांची सेवा करणारे कर्मचारी हेच खरे हिरो असल्याचेही तिने सांगितले. चित्रपटाचे निर्माते जयंतीलाल गडा यांनी सांगितले की, भारताची खरी ओळख म्हणजे संवेदनशीलता आणि एकमेकांबद्दलची आपुलकी.



# सततच्या ट्रोलिंगमुळे आत्मविश्वास तुटला होता

अभिनेत्री हुमा कुरेशीने नुकत्याच एका मुलाखतीत तिच्या करिअरच्या सुरुवातीच्या काळातील कठीण अनुभवांबद्दल मनमोकळेपणाने भाष्य केले. चित्रपटसृष्टीत आल्यानंतर तिला तिच्या शरीरयष्टी, लूक आणि दिसण्यावरून अनेकदा ट्रोलिंग आणि बॉडी शेमिंगला सामोरं जावं लागलं. या सततच्या टीकेचा तिच्या आत्मविश्वासावर मोठा परिणाम झाला होता, असं हुमा म्हणाली. हुमा तिचा भाऊ आणि अभिनेता साकिब सलीमसोबत नेहा धूपिया आणि अंगद बेदी यांच्या 'डबल डेट' या चॅट शोमध्ये सहभागी झाली होती. यावेळी तिने इंडस्ट्रीतील संघर्ष आणि वैयक्तिक आयुष्यातील काही कठीण क्षणांबद्दल खुलासा केला. हुमा म्हणाली की, तिच्या दुसऱ्या चित्रपटानंतर सोशल मीडियावर आणि इंडस्ट्रीत तिच्या लूकवरून अनेक नकारात्मक प्रतिक्रिया येऊ लागल्या. लोक सतत तिच्या शरीरावर आणि दिसण्यावर टिप्पणी करत होते. हुमा म्हणाली, "जेव्हा लोक सतत तुम्हाला जज करतात, तेव्हा त्याचा परिणाम तुमच्या आत्मविश्वासावर होतो. एक काळ असा आला होता की मला स्वतःबद्दल खूप निराश वाटत होतं. मला असं वाटू लागलं होतं की कदाचित मी हे सगळं करू शकणार नाही." या सततच्या टीकेमुळे ती स्वतःबद्दल अस्वस्थ झाली होती. मात्र, कालांतराने हुमा यांनी स्वतःला सावरण्यास सुरुवात केली. तिने मानसिक आरोग्याकडे लक्ष दिलं आणि स्वतःला समजून घेण्यासाठी काही महत्त्वाचे बदल केले. हुमा म्हणाली की, तिने ध्यानधारणा सुरू केली, डायरी लिहायला सुरुवात केली आणि थेरपीची मदतही घेतली. या सगळ्या गोष्टींमुळे तिला स्वतःला स्वीकारायला आणि स्वतःवर पुन्हा विश्वास ठेवायला मदत झाली. ती पुढे म्हणाली, "आता मी स्वतःवर केलेल्या जोक्सवरही हसू शकते. मी गोष्टी अधिक सकारात्मक पद्धतीने घ्यायला शिकले आहे." तिच्या या वक्तव्यामुळे अनेक चाहत्यांनी तिच्या प्रामाणिकपणाचं कौतुक केलं आहे. वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर, हुमा कुरेशी लवकरच अभिनेता यशच्या 'टॉक्सिक' या चित्रपटात दिसणार आहे.

# इशान किशनने जिंकली मनं!

## साकिब हुसैनला दिले ६ स्पाईक शूज; गोलंदाजाने स्वत: केला खुलासा

**महाईन्यूज । हैदराबाद**

**सनरायझर्स हैदराबादचा संघ एलिमिनेटर सामन्यातील पराभवानंतर स्पर्धेबाहेर झाला. राजस्थान संघाने हैदराबादला या सामन्यात पराभूत केलं. पण या हंगामात हैदराबाद संघाला दोन उत्कृष्ट गोलंदाज मिळाले, ते म्हणजे साकिब हुसैन व प्रफुल्ल हिंगे. दोन्ही गोलंदाजांनी पदार्पणाच्या सामन्यात आणि नंतर उर्वरित हंगामात आपल्या कौशल्याची छाप पाडली. दरम्यान साकिब हुसैनने स्पर्धेनंतर इशान किशनबाबत मोठा खुलासा केला आहे.**




हैदराबादने साकिब हुसैनला ३० लाख रुपयांना संघात घेतलं आणि संघातील वरिष्ठ खेळाडू दुखापतग्रस्त असताना त्याला संधी देण्यात आली. साकिबने १३ एप्रिल रोजी राजस्थान रॉयल्सविरुद्ध पदार्पण केलं आणि आपल्या पहिल्याच सामन्यात चार बळी घेतले. त्याच्या आयुष्यातील संघर्षाबद्दल चर्चा सुरू झाली असताना, एक जुना व्हिडिओ समोर आला, ज्यामध्ये त्याने सांगितलं होतं की त्याच्या आईने त्याला स्पाइक शूज विकत घेण्यासाठी आपले दागिने विकले होते. आता त्याने खुलासा केला आहे की, इशान किशनने त्याला या सीझनमध्ये स्पाइक शूजच्या ६ जोड्या गिफ्ट म्हणून दिल्या आहेत.

ईएसपीएनक्रिकइन्फोला दिलेल्या एका मुलाखतीत साकिब हुसेनने खुलासा केला की, इशान किशनने त्याला स्पाइक शूजच्या सहा जोड्या भेट म्हणून दिल्या होत्या. २०१४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सने साकिब हुसैनला संघात घेतलं, पण त्याला पदार्पण करता आलं नाही. त्यानंतर केकेआर फ्रँचायझीने एक मुलाखत घेतली, ज्यात साकिबने घरच्या हालाखीच्या परिस्थितीतही क्रिकेटचं स्वप्न कसं पूर्ण केलं हे सांगितलं. त्याला स्पाइक शूज हवे होते, ज्यांची किंमत १०,००० ते १२,००० रुपये होती. तो त्यासाठी रडायचा आणि त्याच्या आईने त्याला ते शूज विकत घेण्यासाठी आपले दागिने विकले होते.




# भारतीय वंशाच्या श्रेयचा अमेरिकेत डंका; 'स्पेलिंग बी २०२६' जिंकली

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**अमेरिकेतील अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि मानाच्या 'स्क्रिप्स नॅशनल स्पेलिंग बी २०२६' स्पर्धेत भारतीय वंशाच्या मुलांनी पुन्हा एकदा आपल्या अफाट बुद्धिमत्तेची चुणूक दाखवली आहे. अमेरिकेतल्या या स्पर्धेत जिंकणारा नी हरणारा दोन्ही भारतीय वंशाची मुलं आहेत. कॅलिफोर्नियात राहणाऱ्या १४ वर्षीय श्रेय परीख याने अत्यंत चुरशीच्या ठरलेल्या ऐतिहासिक 'स्पेल-ऑफ' (SPELL-OFF) फेरीत नवा विक्रम रचत या स्पर्धेच्या विजेतेपदावर आपले नाव कोरले. ९० सेकंदांच्या थरारक वेळेत तब्बल ३२ शब्दांचे अचूक स्पेलिंग सांगत श्रेयने 'स्क्रिप्स कप' आणि ५०,००० डॉलर्स (सुमारे ४१ लाख रुपये) रकमेचे भव्य बक्षीस पटकावले आहे.**




गुरुवारी रात्री झालेल्या या स्पर्धेत तब्बल ९ फेऱ्यांनंतरही मुख्य स्पर्धा अनिर्णित राहिली. अंतिम फेरीत आठवीत शिकणारा कॅलिफोर्नियाचा श्रेय परीख आणि न्यू जर्सीचा सातवीतील इशान गुप्ता (वय १२) यांच्यात अटीतटीची लढत पाहायला मिळाली. दोघेही मागे हटायला तयार नसल्याने अखेर परीक्षकांनी 'स्पेल-ऑफ' म्हणजेच वेळेच्या मर्यादेत जास्तीत जास्त अचूक शब्द सांगण्याची स्पर्धा घेण्याचा निर्णय घेतला.

विजेतेपदाची विभागणी टाळण्यासाठी २०२१ मध्ये हा नियम आणला गेला होता. या फेरीत स्पर्धकाला स्टेजवर येऊन ९० सेकंदांत जास्तीत जास्त शब्दांचे अचूक स्पेलिंग सांगावे लागते, तर दुसऱ्या स्पर्धकाला हेडफोन लावून वेगळ्या खोलीत बसवले जाते जेणेकरून त्याला शब्द ऐकू जाणार नाहीत.

श्रेयने या फेरीत पहिल्यांदा जात शांतपणे दीर्घ श्वास घेतला आणि 'melengket' (मेलेंगकेत) आणि 'rapakivi' (रापाकिवी) सारख्या अत्यंत कठीण शब्दांचे अचूक स्पेलिंग सांगत एकूण ३५ शब्दांपैकी ३२ शब्दांचे अचूक स्पेलिंग सांगितले. स्पेलिंग बी स्पर्धेच्या इतिहासातील हा एक नवा विक्रम ठरला आहे. इशान गुप्ताने २५ शब्दांचे अचूक स्पेलिंग सांगत चांगली झुंज दिली, पण श्रेयच्या वेगापुढे त्याला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. आठवीत असलेल्या श्रेयसाठी या स्पर्धेत उतरण्याचे हे शेवटचे वर्ष होते.

विजेतेपद जरी श्रेयने पटकावले असले, तरी हुस्टनच्या ६ व्या इयत्तेत शिकणाऱ्या लोगन बेली या चिमुरड्याने डी.ए.आर. कॉन्स्टिट्युशन हॉलमधील हजारो प्रेक्षकांची मने जिंकली. प्रत्येक अचूक स्पेलिंगनंतर डोक्याला हात मारणे, "नो वे!" म्हणून ओरडणे आणि सहकाऱ्यांना 'हाय-फाय' देणे या त्याच्या उत्साही स्वभावामुळे तो प्रेक्षकांचा प्रचंड आवडता बनला.

परंतु, 'Quincke tube' (फुंकर मारल्यावर बाटलीसारखा आवाज करणारी काचेची नळी) या शब्दाने लोगनला चकवले. हा शब्द ऐकताच आपण बाद होणार हे ओळखून तो मंचावरच "नो! नो! नो!" म्हणून रडू लागला. मुख्य परीक्षक मेरी ब्रूक्स यांनी घंटा वाजवून तो बाद झाल्याचे जाहीर करताच संपूर्ण सभागृहात शांतता पसरली.

## तिसरी फेरी ठरली 'क्रूर'; दिग्गज स्पर्धक बाद

स्पर्धेची तिसरी फेरी अत्यंत कठीण आणि धक्कादायक ठरली. या एकाच फेरीत चार कसलेल्या स्पर्धकांचे आव्हान संपुष्टात आले आणि अंतिम शर्यतीत फक्त ५ स्पर्धक शिल्लक राहिले. यामध्ये खालील दिग्गज स्पर्धकांना बाहेर पडावे लागले:

- एडन मेंग: कॅलिफोर्नियाचा हा सातवीतील विद्यार्थी 'CATOMETOPE' (खेकड्याची एक प्रजाती) या शब्दाचे स्पेलिंग चुकल्यामुळे बाद झाला.
- ऑलिव्हर हॅल्केट: लॉस एंजेलिसच्या या १४ वर्षीय मुलाला 'FAESULAE' (इटलीतील एक प्राचीन शहर) या शब्दाने अडचणीत आणले.
- अविष्का दुदाला: १३ वर्षीय अविष्का इंग्रजीतील 'SCHWA' (अस्पष्ट स्वराचा उच्चार) मुळे चुकली. 'OCONEE BELLS' या वनस्पतीच्या नावाचे स्पेलिंग तिने 'ACONAE BELLS' असे केल्याने तिची संधी हुकली.
- इवे स्पेसटाईम: २०२१ ची विजेती झैला अवंत-गार्डेचा हा १४ वर्षीय भाऊ 'VAESITE' (एक प्रकारचे खनिज) या शब्दाचे स्पेलिंग चुकल्याने बाहेर पडला. मात्र, त्याने चेहऱ्यावर हसू ठेवत इतर सहकाऱ्यांना हस्तांदोलन करत मंचाचा निरोप घेतला.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। शनिवार ।
दि. 30 मे 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# डीपी बॉक्स बनले जाहिरातींचे केंद्र; शहराच्या सौंदर्याला बाधा

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

**शहरातील महावितरणचे डीपी बॉक्स बेकायदा जाहिरात पोस्टर्सचे आगार बनले आहे. येथे शहरातील प्लॉटवाले, क्लास, सोने गहान ठेवणे तसेच इतर जाहिरातींचा सुळसुळाट सुरू आहे. परंतु,महापालिकेचा संबंधित विभाग याकडे दुर्लक्ष करत असल्याने शहराच्या सौंदर्याला बाधा येत आहे.**

डीपी बॉक्स बेकायदा जाहिरातींचे केंद्र बनत चालल्याचे धक्कादायक चित्र पिंपळे गुरव परिसरात समोर आले आहे. भरदिवसा काही व्यक्ती महावितरणच्या डीपी बॉक्सवर जाहिरातींचे पोस्टर्स आणि बॅनर्स चिकटवत असल्याचे प्रकार उघडकीस आले असून, यामुळे मोठ्या अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे हे पोस्टर्स लावताना संबंधितांकडून कोणत्याही प्रकारच्या सुरक्षा नियमांचे पालन केले जात नसल्याचे दिसून आले. उच्च दाबाच्या विद्युत प्रवाहाजवळ निष्काळजीपणे काम केल्यामुळे संबंधित व्यक्तींनाच विजेचा धक्का बसण्याचा धोका असून, पावसाळ्यात शॉर्टसर्किट किंवा स्पार्किंग होऊन गंभीर दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक ठिकाणी उभारण्यात आलेल्या डीपी बॉक्सवर सर्रास जाहिराती चिकटवल्या जात असल्याने परिसराचे विद्रूपीकरण होत आहे. फाटलेले पोस्टर्स, डिंकाचे डाग आणि अस्वच्छता यामुळे शहराच्या सौंदर्यावर परिणाम होत असल्याची नाराजी नागरिकांनी व्यक्त केली.


> डीपी अथवा ट्रान्सफॉर्मरवर कोणत्याही प्रकारच्या जाहिराती, पोस्टर्स किंवा बॅनर्स लावणे अत्यंत धोकादायक आहे. त्यामुळे विद्युत शॉक लागून गंभीर अपघात होऊ शकतो. तसेच शहराचे विद्रूपीकरण होऊ नये यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करण्यात येणार आहे.
>
> **- संतोष पंचरस, सहाय्यक अभियंता, महावितरण.**



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*



**UG/PG Programs**

- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW

D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# अवैध धंद्यावर कडक कारवाई करा; खा. बारणे

## फुगेवाडीतील मृत्यांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करण्याची शासनाकडे मागणी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**विषारी दारु पिल्याने दापोडीतील फुगेवाडीतील सात जणांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. भविष्यात अशी घटना घडू नये यासाठी पोलिसांना स्वतंत्र युनीट स्थापन करावे. शहरातील अवैध धंदे, त्याला प्रोत्साहन देणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी सूचना खासदार श्रीरंग बारणे यांनी पोलिसांना दिली आहे. या मृतांच्या नातेवाईकांना राज्य शासनाने आर्थिक मदत करावी, अशी मागणी खासदार बारणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**





दापोडीतील फुगेवाडीत एकाचदिवशी सात जणांचा मृत्यू झाला आहे. खासदार बारणे यांनी दापोडी पोलीस ठाण्यात भेट देऊन सविस्तर माहिती घेतली. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्याशी संपर्क साधला. पोलीस उपायुक्त संदीप आटोळे, सहायक पोलीस आयुक्त सचिन हिरे, विशाल हिरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय वाघमारे यांच्याकडून घटनेचे सविस्तर माहिती घेतली. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी अधीक्षक अतुल कानडे यावेळी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, ही गावठी दारु हडपसर येथील लमान तांडा येथे बनवून विविध विभागात पाठवली जात होती. परदेशी नावाच्या व्यक्तीने सिंग, राठोडला दारु दिली. त्यात केमिकल मिसळण्यात आले. त्याचे प्रमाण जास्त असल्याने दारु विषारी झाली. तिचे प्राशन केल्याने पिंपरी-चिंचवडमधील सात जणांचा मृत्यू झाला आहे. तीघे गंभीर जखमी आहेत. पुण्यातील पाच जणांचा मृत्यू झाला आहे. दापोडीतील मृत्यू झालेले नागरिक गरीब, झोपडपट्टीत राहणारे आहेत. स्वस्तामध्ये दारु मिळत असल्याने त्यांच्याकडून घेतली जात असल्याचे दिसते.

पिंपरी-चिंचवड शहर वाढत आहे. शहरात बाहेरील नागरिकही मोठ्या प्रमाणात आले आहेत. काम न करणाऱ्या लोकांकडून अवैध धंदे केले जातात. शहरात अवैध धंदे सुरु आहेत. या धंद्यावर नियंत्रण आणावे. त्यावर कारवाईसाठी स्वतंत्र युनीट निर्माण करावे. यापुढे अशा घटना घडू नयेत, याची खबरदारी घ्यावी. अवैध धंदे, या धंद्यांना प्रोत्साहन देणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, अशी सूचना खासदार बारणे यांनी केली आहे.

# समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देणाऱ्यांचा सन्मान इतरांसाठी प्रेरणादायी; महापौर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**समाजाच्या उन्नतीसाठी आणि प्रगतीसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करणे ही समाजाची जबाबदारी आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान झाल्याने नव्या पिढीला प्रेरणा मिळते आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होते, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी केले.**



ऑल स्पोर्ट्स अँड मार्शल आर्ट्स फेडरेशन ऑफ पुणे यांच्या वतीने कला, क्रीडा, साहित्य, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २६ मान्यवरांचा 'सरस्वती भूषण गुणगौरव पुरस्कार २०२६' देऊन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते महापौर कार्यालयात गौरव करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी फेडरेशनचे अध्यक्ष सुनील साठे, सचिव मनोज सोनावणे तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान इरा सोनावणे यांनी महापौर रवि लांडगे यांच्या कार्यावर आधारित स्वलिखित कवितेचे सादरीकरण केले. त्यांच्या प्रभावी सादरीकरणास उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

यावेळी बोलताना महापौर रवि लांडगे म्हणाले की, समाजातील सकारात्मक परिवर्तनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती या समाजाच्या खऱ्या प्रेरणास्थान असतात. कला, क्रीडा, शिक्षण, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव केल्याने त्यांच्या कार्याला अधिक बळ मिळते. पिंपरी चिंचवड शहरातील अशा गुणवंत व्यक्तींना भविष्यातही प्रोत्साहन व पाठबळ देण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

### सन्मानित मान्यवर

मनोज साळवे (क्रीडा महर्षी पुरस्कार २०२६), सम्यक कांबळे (कराटे क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य), श्री. पाटील (उत्कृष्ट स्पोर्ट्स अकादमी), जितेंद्र शिंगारे (कराटे क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य), इस्प्रित कटारिया (उत्कृष्ट बॉक्सिंग खेळाडू), उर्मिला जाधव (शैक्षणिक नेतृत्वातील दूरदृष्टीकोन पुरस्कार), दिपाली भादुले (योगा व झुंबा क्षेत्रातील उत्कृष्ट शिक्षक), डॉ. मंजुषा इंगवले (वनस्पतीशास्त्र विभागातील उत्कृष्ट शिक्षक), विश्वास गरजमल (समाजरत्न पुरस्कार), युवराज मनोहर कांबळे (उत्कृष्ट कराटे खेळाडू), आकाश (अभिनय व मॉडेलिंग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य), विजय भस्मे (आर्टिफिशियल स्मार्ट टीचर), हेमराज थापा (क्रीडा महर्षी पुरस्कार २०२६), सुधा ढवळे (कबड्डी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य), गणेश ठोकळ (प्रभावी शिवव्याख्याते), सुदेश गायकवाड (क्रीडा महर्षी पुरस्कार २०२६), राजेंद्र कांबळे (यशस्वी उद्योजक), जितु कटारिया (उत्कृष्ट बॉक्सिंग प्रशिक्षक), धर्मपाल भरणे (युवा उद्योजक), रोहित आढागळे (उत्कृष्ट स्केटिंग प्रशिक्षक), श्रीधरण थांबा (हॉकी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य), श्वेता लिमन (मार्शल आर्ट क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य), मयंक कांबळे (कराटे क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य), प्रतिभा भोसले (अभिनय व मॉडेलिंग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य), रमेश शेलार (कराटे क्षेत्रातील उत्कृष्ट कार्य) आणि पूजा भोसले (यशस्वी उद्योजक) यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

# फुगेवाडीतील मृत्यू प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करा

## शहरातील अवैध दारूचे अड्डे २४ तासांत उद्ध्वस्त करा; आमदार अमित गोरखे

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरातील दापोडी आणि फुगेवाडी परिसरात गुरुवार, २८ मे रोजी एकाच दिवशी आठ नागरिकांचा झालेला संशयास्पद मृत्यू अत्यंत धक्कादायक, गंभीर आणि वेदनादायी आहे. एकाच परिसरातील आठ नागरिकांचा एकाच दिवशी अशा प्रकारे अचानक मृत्यू होणे ही सामान्य बाब नाही. स्थानिक नागरिकांच्या मनात या मृत्यूंविषयी मोठा संशय असून, परिसरात अवैध हातभट्टीच्या विषारी दारूमुळेच हा प्रकार घडल्याचा गंभीर आरोप केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची दूध का दूध आणि पाणी का पाणी करण्यासाठी पोलीस प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी करावी, अशी आग्रही मागणी भारतीय जनता पक्षाचे आमदार अमित गोरखे यांनी केली आहे.**



या घटनेची गंभीर दखल घेत आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त (CP) यांना तातडीने अधिकृत पत्र पाठवून कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. याविषयी अधिक बोलताना आमदार गोरखे म्हणाले, फुगेवाडीतील ही घटना अतिशय दुर्दैवी आहे. या दुःखाच्या प्रसंगी आम्ही मृत व्यक्तिंच्या कुटुंबियांच्या पाठीशी उभे आहोत. स्थानिक नागरिकांमध्ये या घटनेमुळे भीती आणि तीव्र संतापाचे वातावरण आहे. जनतेच्या मनात निर्माण झालेला हा संभ्रम दूर करणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे हे पोलीस प्रशासनाचे कर्तव्य आहे. या प्रकरणात कोणताही राजकीय हस्तक्षेप किंवा तपास भरकटवण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही.

या घटनेत एकाच वेळी आठ नागरिकांचा बळी गेला असतानाच, दुसरीकडे सुभाष डिगीकर आणि अक्षय अवसरमल हे दोन तरुण सध्या रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहेत. पिंपरी-चिंचवड शहराला अवैध धंद्यांचा विळखा बसू दिला जाणार नाही. या प्रकरणाचा तपास योग्य दिशेने व्हावा यासाठी मी स्वतः राज्याच्या गृहविभागाकडेही सातत्याने पाठपुरावा करणार आहे, अशी ग्वाही आमदार अमित गोरखे यांनी दिली.

### गुन्हेगारांवर तात्काळ कठोर कारवाई करा..

सर्व मृत नागरिकांचे शवविच्छेदन आणि फॉरेन्सिक अहवाल तातडीने मागवून घेऊन मृत्यूचे नेमके कारण काय आहे, हे लवकरात लवकर स्पष्ट करावे. दापोडी, फुगेवाडी या परिसरांसह संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरातील कामगार व झोपडपट्टी परिसरांमध्ये छुप्या पद्धतीने सुरू असलेले अनधिकृत हातभट्टीचे, बेकायदेशीर दारूचे व इतर अवैध अड्डे शोधून ते पुढील २४ तासांत तात्काळ उद्ध्वस्त करण्यात यावेत. जर या नागरिकांचा मृत्यू विषारी दारूमुळे किंवा कोणत्याही बेकायदेशीर कृत्यामुळे झाला असल्याचे निष्पन्न झाले, तर त्यामागे असलेल्या मुख्य सूत्रधारांवर आणि गुन्हेगारांवर तात्काळ कठोर कलमांखाली गुन्हे दाखल करून कडक कारवाई करण्यात यावी. संबंधित पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशा बेकायदेशीर गोष्टी पुन्हा घडू नयेत, यासाठी रात्रीची पोलीस गस्त वाढवण्यात यावी आणि पोलिसांची गुप्तवार्ता यंत्रणा अधिक सतर्क करण्यात यावी, या मागण्या आमदार अमित गोरखे यांनी पोलीस आयुक्तांकडे केल्या आहेत.

# मोशी चिखलीतील समस्यामुळे हाउसिंग सोसायटी संघटना आक्रमक

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मोशी–चिखली परिसरातील गंभीर पाणीटंचाई आणि रखडलेल्या रस्ते विकास कामांबाबत पिंपरी-चिंचवड-चाकण हाउसिंग सोसायटी संघटन यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, प्रशासनाला ५ जूनपर्यंतची अंतिम मुदत दिली आहे. या कालावधीत ठोस कार्यवाही व लेखी आश्वासन न मिळाल्यास ६ जूनपासून शांततापूर्ण आंदोलनासह आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशाराही संघटनने दिला आहे.**

PIMPRI-CHINCHWAD CHAKAN HOUSING SOCIETY SANGATHAN




मोशी–चिखली परिसरातील अनेक हाउसिंग सोसायट्यांना गेल्या अनेक महिन्यांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. अत्यल्प पाणी दाब, अनियमित पुरवठा तसेच दूषित पाणी मिळत असल्याच्या तक्रारी सातत्याने येत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना खासगी टँकरवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून राहावे लागत असून, त्यामुळे घरगुती खर्चात लक्षणीय वाढ होत आहे.

संघटनेच्या वतीने प्रशासनाकडे वेळोवेळी निवेदने देऊनही परिस्थितीत कोणतीही ठोस सुधारणा झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासोबतच ऐश्वर्यम ॲप्रोच रोड तसेच होरायझन ते रामा/स्वराज कनेक्टिंग रोड या महत्त्वाच्या रस्ते विकास कामांना अद्याप सुरुवात न झाल्याने परिसरातील नागरिक, विद्यार्थी व कामगार वर्गाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

मोशी–चिखली परिसरासाठी कायमस्वरूपी पाणी साठवण प्रकल्प उभारण्याचा प्रस्तावही संघटनने प्रशासनास सादर केला असून, हा विषय कोणताही राजकीय नसून केवळ मूलभूत नागरी सुविधांशी संबंधित असल्याचे संघटनने स्पष्ट केले आहे.

> “नागरिक केवळ मूलभूत सुविधा म्हणून योग्य पाणीपुरवठा आणि रस्ते विकासाची मागणी करत आहेत. प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून नागरिकांना रस्त्यावर उतरण्याची वेळ येऊ देऊ नये. दरम्यान, ५ जूनपर्यंत सकारात्मक निर्णय न झाल्यास ६ जूनपासून सुरू होणारे आंदोलन व आमरण उपोषण प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.
>
> **– सत्यव्रत त्रिपाठी, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड-चाकण हाऊसिंग सोसायटी संघटन.**


PRIYADARSHANI SCHOOL & JR COLLEGE
MOSHI
43 YEARS OF
NURTURING VALUES,
EXCELLENCE AND
TOMORROW'S LEADERS.
ADMISSIONS OPEN FOR AY 2026-27
Grade Nursery to Grade V
WHY CHOOSE PRIYADARSHANI SCHOOL?
43 Years of Excellence in Education | Advanced Robotics & Computer Labs
Experienced and Dedicated Faculty | Multiple Sports Grounds for All-Round Development
Proven 100% Results in Grade X | A Perfect Blend of Tradition and Innovation
+91 9890613333 | +91 9373073077
pgosm05@gmail.com
www.priyadarshanischoolmoshi.in